# प्रेस नोट दिनांक ११/०८/२०२३

## " पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, अंतर्गत देहुरोड पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रातील जगदगुरु संत तुकाराम महाराज मंदीर परिसरात आंतकवादी शिरकाव प्रात्यक्षिक (मॉक ड्रिल) कारवाई केलेबाबत."

आज दि.११/०८/२०२३ रोजी सायंकाळी १७/३० ते १९/०० वा.चे दरम्यान मौजे देहुगाव येथील जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज मंदीरात आंतकावादयांनी शिरकाव केलेनंतर करावयाच्या कारवाईच्या अनुषंगाने प्रात्यक्षिक करणेत आले.

सदर मंदिरात प्रत्यक्षात अतिरेकी घुसले आणि त्यांनी काही वारकरी व भाविक यांना बंधक केले तर सदर वारकरी व भाविक यांची सुखरुप सुटका करुन अतिरेकी यांचेवर कशा पदधतीने कारवाई करता येईल याचा प्रत्यक्षात सराव करणेत आला. सदर कारवाई दरम्यान पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय अंतर्गत परिमंडळ २ चे उपायुक्त डॉ.काकासाहेब डोळे,श्री.अमरनाथ वाघमोडे,तळवडे वाहतुक विभाग,सत्यवान माने वरिष्ठ पोलीस निरीक्षक,तळेगांव दाभाडे पोलीस स्टेशन, दिगंबर सूर्यवंशी , वरिष्ठ पोलीस निरीक्षक देहुरोड पोलीस स्टेशन, वनिता धुमाळ वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिरगाव पोलीस स्टेशन,सहा पोलीस निरीक्षक श्री राऊत,दहशतवाद विरोधी पथक,पिंपरी चिंचवड आयुक्तालय यांचेसह ०६ पोलीस स्टेशनचे १० सहा पोलीस निरीक्षक/पोलीस उप-निरीक्षक,७० अंमलदार,पोलीस मुख्यालयाकडील ०२ आर.सी.पी पथक,०१ क्युआरटी पथक,पुणे ग्रामीणचे बीडीडीएस पथक,ॲम्ब्युलन्स वैदयकीय उपचार पथक,फायर ब्रिगेड वाहन यांनी सहभाग नोंदवला.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त सो पिंपरी चिंचवड विनय कुमार चौबे सो,सह पोलीस आयुक्त श्री डॉ.संजय शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त श्री.वंसत परदेशी,पोलीस उप-आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.